१.एक दृष्टीक्षेप

# आमचं गाव, आमचा विकास

# १.आवश्यकता

- ग्रा. पं. स्तरावर मानव  विकास  निर्देशाकावर आधारित विकास प्रक्रिया राबविण्या करिता .
- ग्रा.पं. स्तरावर मोठ्या प्रमाणात मिळणाऱ्या निधीचे सुयोग्य नियोजन
- ग्रा.पं. मधील विकास प्रक्रिया एकात्मिक व सर्व समावेशक करण्यासाठी.
- गावातील नागरिकांचा आणि गावाचा शाश्वत विकास साधण्यासाठी .
- लोकसहभागातून  मर्यादित संसाधनाद्वारे आपल्या  ग्रा.पं. मधील समस्या सोडविण्यासाठी .
- गावातील नागरिक, लोकप्रतिनिधी व प्रशासन यांच्या समन्वयातून विकास

# २.आताच गरज का ?

- **७३वी घटना दुरुस्तीने**

पंचायत राज संस्थांना घटनात्मक दर्जा दिला. मात्र स्थानिक स्तरावर शासन म्हणून काम करण्याकरिता आर्थिक पाठबळ कमी पडत होते. १४ व्या वित्त आयोगाने ग्रामपंचायतीला स्थानिक स्तरावरील समस्या त्यांच्याच पातळीवर सोडविण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. सलग ५ वर्ष मोठ्या प्रमाणात निश्चितपणे लोकसंख्येच्या प्रमाणात मिळणाऱ्या निधीचे जर योग्य दिशा ठेवून नियोजन झाले नाही तर ग्रा.पं. स्तरावर आलेली संधी वाया जाईल.

## २.आताच गरज का ?

- **कोणासाठी**? :- गावातील नागरिकांच्या समग्र विकासासाठी
- **कोण करणार**?:- गावातील नागरिक  व लोकप्रतिनिधींच्या नेतृत्वाखाली आणि  ग्रा. पं. स्तरावर कार्यरत सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांच्या मदतीने आराखडा तयार करावयाचा आहे.
- **कामांची निवड करणे आणि वर्षनिहाय त्यांचा प्राधान्यक्रम निश्चित करणे हा पूर्णपणे ग्रामसभेचा अधिकार असणार आहे.**

# ३.विकास नेमका कोणाचा ?

**विकास करणे म्हणजे फक्त गावठाणा अंतर्गत बांधकामे करणे नाही, तर ........**

- ग्रा.पं. गावठाणामधील सर्व महसुली गावांच्या वाड्या वस्त्या मधील पायाभूत सुविधांचा विकास (कोणतीही छोटी वाडी व वस्ती वंचित रोहणार नाही याची काळजी घेणे)
- ग्रा.पं. क्षेत्रात येणाऱ्या सर्व व्यक्तींचा मानव विकास (आरोग्य, शिक्षण व दरडोई उत्पन्न )

# ३.विकास नेमका कोणाचा ?

- सामाजिक न्यायाच्या तत्वावर आधारित  विशेषतः वंचित घटकांचा विकास (महिला, बालके, अनुसूचित जाती, जमाती, भटक्या जमाती, अल्पसंख्याक, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक इत्यादी)
- ग्रा. पं. च्या परीसरातील व अखत्यारीतील सर्व नैसर्गिक संसाधनांचा (जल, जंगल, जमीन, जनावरे) विकास. अशी सर्व समावेशक भूमिका स्वीकारावी लागेल

# ४.ग्रामसभेची भूमिका.

१४ व्या वित्त आयोगाचा निधी (राज्य स्तरावरून थेट ग्राम स्तरावर बँकेमार्फत पाठविला जाणार आहे), म.ग्रा.रो.ह.यो. करिता ग्रामसभेने केलेल्या नियोजनानुसार ग्रा.पं. प्राप्त होणारा निधी, ग्रा.पं. चा स्वनिधी, पेसा गावांकरिता ५% अबंध निधी इ. एकत्रित निधी समोर ठेवून ग्राम विकास आराखडा ग्रामसभेला तयार करावयाचा आहे.

- ग्राम संसाधन गटाची स्थापना ग्रामसभेत करावयाची आहे.
- निधीतून करावयाची कामे निवडणे व ग्रामपंचायत विकास आराखड्याला प्रशासकीय मान्यता देणे हे सर्व अधिकार ग्रामसभेला देण्यात आले आहेत.
-

# ४.ग्रामसभेची भूमिका.

- तसेच, कामाच्या प्रगतीवर आणि गुणवत्तेवर नियंत्रण ठेवणे, विकास योजनांचे सामाजिक अंकेक्षण करणे ही सर्व जबाबदारी आता ग्रामसभेवरच आहे.
- त्यामुळे आता ग्रामसभेतील प्रत्येक सदस्यावर मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. आता गावातील प्रत्येक सज्ञान व्यक्तीने ग्रामसभेला हजर राहून, सगळी माहिती समजावून घेऊन ग्रामसभेच्या कामकाजामध्ये सक्रीय सहभाग घेणे आवश्यक आहे.

## ५.ग्रामपंचायतीची भूमिका.

- ग्राम विकास आराखडा तयार करण्यासाठी ग्राम पंचायत सदस्य, गावस्तरावरील विविध समित्यांचे सदस्य तसेच गावस्तरीय कर्मचारी यांच्या मध्ये समन्वय साधणे.
- गावातील सर्वांना आराखडा निर्मितीसाठी जागरूक बनविणे.
- <u>ग्राम संसाधन गटाची स्थापना ग्रामसभेत करून घेणे .</u>

# ५.ग्रामपंचायतीची  भूमिका.

- तीन दिवसीय प्रक्रियेची योग्य प्रचार प्रसिद्धी करणे व त्यात सक्रीय सहभागी होणे.
- प्रत्येक टप्प्यावर ग्रामसभेला आवश्यक असणारी माहिती व सहाय्य देणे.
- ग्रामसभेच्या मदतीने पंचवार्षिक बृहत विकास आरखडा आणि दरवर्षी वार्षिक विकास व कृती आराखडा तयार करणे.

# ५.ग्रामपंचायतीची भूमिका.

- आवश्यक वाटेल तिथे शासकीय यंत्रणा अथवा सामाजिक संस्थांकडून तांत्रिक सहाय्य घेणे.
- योजनेतील कामे व खर्च यांची काळजीपूर्वक नोंदी ठेवणे, कामांच्या गुणवत्तेचा सामाजिक लेखाजोखा करून घेणे.
- हाती घेतलेली विकास कामे विहित मुदतीत पूर्ण करून त्यांचे पूर्णत्वाचे दाखले प्राप्त करून घेणे.
- १४ व्या वित्त आयोगाच्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनाला देणे.

# ६.लोकप्रतिनिधी व नागरिकांच्या सहभागाची गरज

- पंच वार्षिक बृहत आराखड्यातीलच कामांची निवड वार्षिक विकास आराखड्यात करावयाची आहे. म्हणून पंच वार्षिक विकास आराखड्याच्या निर्मितीत लोकप्रतिनिधी व नागरिकांच्या सहभागाची आवश्यकता आहे.
- ग्रामस्थांना नंतर त्यांच्या बदलत्या गरजांप्रमाणे फेरबदल करायचे असतील तर त्याला मु.का.अ. यांची परवानगी घ्यावी लागेल.
- गावातील समस्यांचा अचूक वेध घेत त्या सोडविण्याच्या उपाय योजनांचा आराखड्यात समावेश करण्यासाठी सहभाग आवश्यक आहे.

# ६.लोकप्रतिनिधी व नागरिकांच्या सहभागाची गरज

- गावाच्या व नागरिकांच्या विकासाची वर्तमान व भविष्यातील दिशा निश्चित करण्यासाठी लोकसहभाग गरजेचा आहे.
- तीन दिवसीय प्रक्रियेची सर्व लोकप्रतिनिधींनी प्रचार प्रसिद्धी करून लोकांना सहभागी होण्याचे आवाहन करणे.
- वाड्या व वस्त्या वरील नागरिक आणि युवकांनी स्वयं स्फुर्तीने स्वयं सेवक म्हणून सहभागी होऊन ग्रामसभेत सहभागी होणे , हि लोकसहभागी नियोजनाची पूर्व अट आहे. त्या शिवाय गट ग्रा. पं. मधील इतर वाड्यांच्या समस्यांचे प्रतिबिंब आराखड्यात पडणार नाही . परिणामी त्यावर उपाय योजना देखील करता येणार नाही.

# ७.गावातच लोकसहभागातून नियोजन

- ग्राम विकास आराखड्याच्या माध्यमातून आता ग्राम पंचायती व ग्रामसभांना स्वत:च स्वत:चो विकास साधायचा असल्याने यासाठीची नियोजन प्रक्रिया देखील गावांमध्येच होणार आहे.
- गावातील सर्व नागरिक, महिला, युवक, किशोरवयीन मुली, मागास व वंचित घटकांच्या सहभागाची खात्री करणे. यामुळे, स्थानिक पातळीवरच्या नेमक्या गरजा लक्षात घेऊन आपल्याला नियोजन अधिक वास्तववादी बनविता येईल.

# ७.गावातच लोकसहभागातून नियोजन

- गावातच नियोजन प्रक्रिया  ठेवल्याने आवश्यक तेथे आपल्याला वर्ग खोलीतून बाहेर पडून गाव व शिवार पाहणी, ग्राम पंचायत कार्यालय भेट याद्वारे नियोजनाचे  विषय अधिक चांगल्या पद्धतीने समजावून घेता येतील.
- आराखडा निर्मितीच्या कामात मार्गदर्शन  देण्यासाठी प्रशिक्षक व दर्जेदार साहित्य  राज्य स्तरावरून पुरविण्यात येईल.
- आपल्या भागातली स्थानिक परिस्थिती व प्रश्न विचारात घेऊन हे नियोजन आपल्याला खऱ्या अर्थाने उपयुक्त बनवायचे आहे.

# ८.निर्मितीत आपलेही योगदान

- आपल्या ग्राम पंचायतीमधील सर्व अपेक्षित व्यक्ती (सरपंच/ उपसरपंच, विविध समितीचे सदस्य व गट ग्रा. पं. असल्यास सर्व गावांचे योग्य प्रमाणात प्रतिनिधी) नियोजन प्रक्रियेसाठी हजर आहेत का ते बघूया.
- आराखडा निर्मितीसाठी पुरेसे साहित्य मिळाले आहे का तपासूया.
- स्थळाची पाहणी करून खालील गोष्टींची व्यवस्था आहे याची खात्री करूया:
  - प्रशिक्षक व चार्ज ऑफिसर यांच्या राहण्याची सोय गावामधील विविध घरांमध्ये करावी
  - संसाधन गटाचे सर्व लोक गोलाकार बसू शकतील व अभ्यास खेळ, गटचर्चा व अध्ययन सत्र घेता येतील असे प्रशिक्षण स्थळ असावे
  - दर्शी बनवूया!

# ८.निर्मितीत आपलेही योगदान

- प्रशिक्षणाच्या ठिकाणी विजेची व्यवस्था असावी
- लिहिण्या करिता फळा, खडू, डस्टर इ. असावे
- सामाजिक नकाशा काढण्याकरिता गावातील मध्यवर्ती ठिकाणाची निश्चिती करून ठेवावी
- शिवार फेरी करिता संबंधित कर्मचारी – कृषी सहाय्यक, तलाठी, वन रक्षक, पोलीस पाटील इत्यादी उपस्थित राहतील याची खात्री करणे
- काही कमतरता राहिली असेल तर आपणच पुढाकार घेऊन सर्वांच्या मदतीने आपल्या प्रभागातील नियोजन आदर्श बनवूया!

# ९.ग्रामविकासातून मानव विकासाकडे वाटचाल

**ग्राम विकास म्हणजे फक्त बांधकामे नव्हे!**

**मानवी विकासाचे पैलू :**

- **आरोग्य :**

गावातील प्रत्येक नागरिकाला आरोग्यदायी जीवन जगता यावे असे वातावरण निर्माण करणे उदा. **गावातील बालमृत्यू, कुपोषण कमी करणे, संसर्गजण्य रोग** टाळण्याकरिता तरतूद करणे आणि आरोग्य सुधारण्यासाठी करावयाची कामे

# ९.ग्रामविकासातून मानव विकासाकडे वाटचाल

- **शिक्षण** :

गावातील प्रत्येक नागरिक शिक्षित असावा जेणेकरून तो स्वावलंबी होऊन व सुज्ञपणे स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ शकेल **उदा. गुणवत्तापूर्ण शिक्षण , शाळा गळती रोखणे यासाठी करावयाची कामे.**

# ९.ग्रामविकासातून मानव विकासाकडे वाटचाल

- **उपजीविकेची साधने**:

गावातील प्रत्येक प्रौढ नागरिकाला रोजगार / उत्पन्नाचे साधन उपलब्ध व्हावे जेणेकरून ते स्वावलंबी होतील व स्वतःच्या कुटुंबाची योग्य काळजी घेतील उदा.  स्वयंरोजगार व वेतनी रोजगारासाठी कौशल्यवृद्धी  प्रशिक्षणाचे आयोजन करून दरडोई उत्पन्नात वाढ करण्याकरिता प्रयोजन करणे

# १०.ग्रामसुची मधील कामांना प्राधान्य

- **महाराष्ट्र ग्रा.पं. अधि. १९५८ च्या कलम ४५ मधील अनुसूची १ मध्ये दिलेली कामे करता येतात.**

| अ.क्र. | विषय | अ.क्र. | विषय |
|---|---|---|---|
| १ | कृषी | ८ | पाटबंधारे |
| २ | पशु संवर्धन | ९ | उद्योगधंदे व कुटिरोद्योग |
| ३ | वने | १० | सहकार |
| ४ | समाज कल्याण | ११ | ग्राम संरक्षण व स्व संरक्षण |
| ५ | शिक्षण | १२ | सामान्य प्रशासन |
| ६ | वैद्यकीय आणि आरोग्य | १३ | अपारंपरिक उर्जा |
| ७ | इमारती व दळणवळण | १४ | माहिती तंत्रज्ञान |

धन्यवाद